


परळी समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...

# संघर्षनेता

https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 136 | बुधवार दि. 10 जुन 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060

या पॅनलवर आपली जाहिरात हवी आहे
त्वरित संपर्क करा

# मेंढपाळांचे स्थलांतर रोखण्यासाठी अर्ध बंदिस्त मेंढीपालन योजनेचा प्रकल्प अहवाल सादर करा

## मंत्रालयातील आढावा बैठकीत ना. पंकजाताई मुंडे यांचे निर्देश




मुंबई, दि. 9 : राज्यातील मेंढपाळांची भटकंती थांबविण्यासाठी अशा मेंढपाळांची माहिती जमा करुन प्रायोगिक तत्वावर अर्धबंदिस्त पद्धतीने मेंढीपालन प्रकल्प योजना राबविण्यासाठी अभ्यास अहवाल सादर करण्याचे निर्देश पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आज दिले.

राज्यातील मेंढपाळांच्या भटकंती व स्थलांतराच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आढावा बैठक पार पडली. यावेळी कृषी मंत्री दत्ता भरणे, आमदार प्रताप अडसड, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन, पुण्यश्लोक अहिल्याबाई महाराष्ट्र मेंढी विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. शीतलकुमार मुकणे, अमरावती मेंढपाळ धनगर विकास मंचचे अध्यक्ष संतोष महात्मे आदि उपस्थित होते.महाराष्ट्रातील बहुतांश मेंढपाळ मेंढीपालन व्यवसायासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करत असतात. त्यामुळे त्यांना शिक्षण, आरोग्य, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. वैद्यकीय सुविधा वेळेवर उपलब्ध होत नसल्याने काही ठिकाणी जीवितहानीच्या घटनाही घडतात. या समस्यांवर कायमस्वरुपी उपाय शोधण्यासाठी अभ्यास अहवाल सादर करण्याचे निर्देश श्रीमती मुंडे यांनी यावेळी दिले.यावेळी प्रामुख्याने एका ठिकाणी अर्धबंदिस्त पद्धतीने मेंढीपालन करण्याच्या संकल्पनेवर चर्चा करण्यात आली. प्रायोगिक तत्त्वावर अर्धबंदिस्त मेंढीपालन व्यवसाय सुरु करण्याबाबत अभ्यास अहवाल सादर करण्याच्या सूचना मंत्री पंकजा मुंडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.अहवाल प्राप्त झाल्यानंतर अर्धबंदिस्त शेळी व मेंढीपालनासाठी आवश्यक पुढील उपाययोजना करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.सध्या 'राजे होळकर महामेष योजना' अंतर्गत वैयक्तिक पान 3 वर

# सजग आणि जबाबदार नागरिक घडवण्यासाठी मूल्य आधारित शिक्षण काळाची गरज

## – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



मुंबई : शालेय शिक्षणात गुणवत्तावृद्धी घडवत विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, संवादकौशल्य आणि चांगल्या नागरिकत्वाचे गुण विकसित करण्यासाठी मूल्य शिक्षणाला विशेष महत्त्व आहे. सजग आणि जबाबदार नागरिक घडवण्यासाठी मूल्य आधारित शिक्षण काळाची गरज आहे. या पार्श्वभूमीवर राज्यात मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्याची अंमलबजावणी व्यापक स्तरावर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या परिणाम साध्यतेच्या मूल्यमापनाचा आढावा घेण्यात आला त्या वेळी ते बालत होते. शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे हे दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते. राज्यमंत्री पंकज भोयर, सामाजिक कार्यकर्ते शांतीलाल मुथ्था, मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, शालेय पान 3 वर

# आज ठळक

## जावयाच्या धोंड्याच्या आहेरावर मांजराचा डल्ला!



### अधिक मासातील आहेराची भन्नाट कहाणी; अखेर शस्त्रक्रियेनंतर मिळाला सोन्याचा खजिना

टाकरवण : अधिक मास म्हटला की जावईबापूंचा मान-सन्मान, सासुरवाडीतील पाहुणचार, गोडधोड जेवण आणि सोन्या-नाण्यांचे आहेर हे ठरलेलेच. पण टाकरवण परिसरातील एका गावात अधिक मासाच्या निमित्ताने घडलेला प्रकार ऐकून तुम्हालाही हसू आवरणार नाही. कारण जावईबापूंना देण्यासाठी तयार ठेवलेली सोन्याची अंगठी थेट घरातील मांजरानेच गिळंकृत केली आणि संपूर्ण कुटुंबाला अक्षरशः चार दिवस सोन्याच्या शोध मोहिमेवर जावे लागले!

घटनेनुसार, अधिक मासानिमित्त लेक आणि जावयाला धोंडे जेवणासाठी सासुरवाडीत बोलावण्यात आले होते. जावईबापूंचा मान राखण्यासाठी सासूबाईंनी खास पाच ग्रॅम सोन्याची अंगठी बनवली होती. ती अंगठी जावयाला सरप्राईज म्हणून देण्याचा बेत होता. म्हणून अंगठी एका पिठाच्या धोंड्यात लपवून ठेवण्यात आली होती. घरात पाहुण्यांची लगबग, स्वयंपाकाची धांदल आणि जावईबापूंच्या स्वागताची तयारी सुरु असतानाच अचानक घरातील एका मिशीवाल्या पाहुण्याने एंट्री घेतली. सर्वांचे लक्ष दुसरीकडे असताना त्या मांजराने अंगठी पान 3 वर

# महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यात सीईटी सेलचे विद्यार्थी सहाय्यता केंद्र ,

## ➡ शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांची घोषणा



राज्यातील विद्यार्थ्यांना सीईटी परीक्षा, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया ( CAP ), शिष्यवृत्ती योजना आणि प्रवेश प्रक्रिया संदर्भात अचूक माहिती योग्य मार्गदर्शन त्यांच्या जिल्ह्यातच उपलब्ध व्हावे, यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात 'सीईटीसेलचे विद्यार्थी सहाय्यता केंद्र' सुरु करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे, अशी घोषणा उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केली आहे. मंत्रालयात उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली.यावेळी उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश पान 3 वर

# पालकांनो लक्ष द्या राज्यातील शाळा 15 जूनपासून सुरू होणार

## विदर्भातील प्राथमिक शाळा सोमवार 22 जून पासून सुरू



उन्हाळा संपून आता पावसाळ्याला सुरुवात झाली आहे. त्यामुळे शाळा सुरु होण्याची तारीखही जवळ आली आहे. पालक आणि विद्यार्थ्यांची लगबग सुरु आहे. मात्र आता राज्यातील शिक्षण विभागाने शाळा सुरु करण्याबाबत मोठा निर्णय घेतला आहे. याबाबत एक परिपत्रक जारी करण्यात आले आहे. यात महाराष्ट्रातील शाळा 15 जूनला सुरु होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. तर विदर्भातील पान 3 वर

# पत्रकार गृहनिर्माण संस्थेच्या जागेवर 'नमो उद्यान'चा डाव?

## पत्रकारांच्या हक्काच्या जागेसाठी 11 जून रोजी भूमिपूजन; दीपक देशमुख यांचे आवाहन



परळी वैजनाथ | प्रतिनिधी परळी वैजनाथ नगरपालिकेच्या कारभारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पत्रकार व संपादक बांधवांसाठी पूर्वी राखीव ठेवण्यात आलेल्या पत्रकार गृहनिर्माण संस्थेच्या सर्वे नंबर 422 जागेवर आता 'नमो उद्यान' उभारण्याचा प्रयत्न सुरु असल्याची चर्चा शहरात रंगली आहे. या पार्श्वभूमीवर पत्रकार बांधवांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, आपल्या हक्काच्या जागेसाठी एकजूट दाखवण्याची वेळ आल्याची भावना व्यक्त केली जात आहे.





मिळालेल्या माहितीनुसार, पत्रकार गृहनिर्माण संस्थेसाठी नियोजित करण्यात आलेल्या जागेबाबत प्रशासनाकडून नव्याने हालचाली सुरु झाल्या आहेत. याच जागेवर नमो उद्यान उभारण्याचा प्रस्ताव पुढे आणला जात असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे पत्रकारांच्या हक्काच्या जागेवर गदा येण्याची शक्यता निर्माण झाली असून, या पान 3 वर

# शाळांमध्ये विशेष आधार शिबिरांचे आयोजन करावे- जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

## जिल्हास्तरीय आधार नोंदणी समितीची बैठक संपन्न




बीड, दि.9 (जिमाका): जिल्ह्यात आगामी 15 जूनपासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होत आहे. या पार्श्वभूमीवर शाळा सुरु होताच विद्यार्थ्यांच्या आधार नोंदणी आणि अद्ययावतीकरणासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी परस्परांशी समन्वय ठेवून विशेष शिबिरांचे आयोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले. पान 3 वर

# अतिशय दुर्मिळ ठेवा असलेल्या या अभंग गाथेचा व्यापक प्रसार व्हावा- आ. धनंजय मुंडे

## दुर्मिळ 'संत जगमित्रनागा अभंग गाथे'चे माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या हस्ते प्रकाशन




परळी वैजनाथ | प्रतिनिधी वारकरी संप्रदाय, संत साहित्य पान 3 वर

पाहिजेत
श्री पद्मावती शिक्षण संस्था संचलित
संस्कार प्राथमिक शाळा
ता. परळी वैजनाथ, जि. बीड
● परळी शहरातील नामांकित शिक्षण संस्था संस्कार प्राथमिक शाळेत तासिका तत्वावर खालील पदे त्वरित भरणे आहे.

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | पद संख्या |
| --- | --- | --- |
| 01 | B.Ed. Science (शिक्षक) | 01 |
| 02 | D.Ed. (शिक्षिका) | 02 |
| 03 | A.T.D | 01 |
| 04 | बालवाडी (पदवीधर - शिक्षिका) | 01 |

10 जुन
उमेदवारांनी बुधवार दि. 10 जुन रोजी मूळ कागदपत्रांसह सकाळी 10 ते 1 या वेळेत स्वखर्चाने प्रत्यक्ष मुलाखतीस उपस्थित रहावे.
स्थळ - संस्कार प्रा. शाळा
• पद्मावती विभाग, परळी वैजनाथ •
मुख्याध्यापिका –
• संस्कार प्रा. शाळा, परळी वैजनाथ •
मोबा. 9822955953

# अनुदानित बियाणांसाठी परळी तालुका कृषी अधिकारी कार्यालयात शेतकऱ्यांनी केले ठिय्या आंदोलन !

- शेतकऱ्यांना बियाणासाठीचे परमिट मिळाले असताना बियाणे देण्यास कृषी सेवा केंद्रांनी नकार दिल्याने शेतकरी संतप्त !
- शेतकऱ्यांनी आंदोलन करताच तालुका कृषी अधिकाऱ्यांना आली जाग ; उर्वरित बियाणाची केली मागणी !





परळी(प्रतिनिधी) महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने खरीप हंगाम 2026 साठी 100% अनुदानावर बियाणे देण्यात येते यासाठी ऑनलाईन अर्ज केलेल्या शेतकऱ्यांना प्राधान्यक्रमानुसार निवड झालेली असल्याने तालुका कृषी अधिकारी कार्यालया मार्फत बियाणे घेण्यासाठी परमिट देण्यात आले परंतु सोमवारी ते परमिट घेऊन शेतकरी मोंढ्यात गेल्यास त्यांना बियाणे देण्यास कृषी सेवा केंद्र चालकानी नकार दिला,त्यामुळे आज सकाळी 10 वाजता तालुका कृषी अधिकारी कार्यालयात कोणताही कर्मचारी व अधिकारी नसल्याने कार्यालयात शेतकऱ्यांनी ठिय्या आंदोलन केले.

याबाबत सविस्तर वृत्त कि,महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागा राज्यातील शेतकऱ्याकडून ऑनलाईन अर्ज घेऊन प्रथम येनारास प्रथम प्राधान्य या नियमाप्रमाणे मार्च खरीप हंगाम 2026 साठी सोयाबीन व इत्तर बियाणे देण्यात येत आहे,त्यानुसार परळी तालुक्यातील 1792 शेतकऱ्यासाठी 983 क्विंटल बियाणे पान 3 वर

# फुले-आंबेडकरी चळवळीचा बुलंद आवाज आणि गोरगरिबांचा आधारवड

# सचिन भाऊ कागदे



## अन्यायाविरुद्ध संघर्ष, समाजासाठी समर्पण आणि स्वाभिमानाची अखंड चळवळ

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी हजारो वर्षापासून अज्ञानाच्या धर्मवाद, जातीयवाद, अंधश्रद्धा,वाईट रुढी वपरंपरा व गुलामगिरीच्या खाईत सापडलेल्या बहुजन समाजाला आपल्या कर्तुत्वाच्या जोरावर आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर अनेक संघर्ष अनेक लढे उभा करून मानवाला मानवपण नाकारणाऱ्या मनुवादी संस्कृतीला जिवंत गाडण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी जो संघर्ष केला त्या संघर्षाला या इतिहासामध्ये तोड नाही. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी या समाजाला जे योगदान दिलेला आहे. त्या योगदानाला या जगात तोड नाही.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतःच्या कुटुंबीयांसाठी काही केले नाही परंतु या समाजासाठी संपूर्ण आयुष्य खर्ची घातले त्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या उपकाराचे ओझे आम्हाला कधीच फेडता येणार नाही. त्यांच्या विचारांना नतमस्तक होऊन आम्ही डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्यासाठी सदैव प्रयत्नशील आहेत. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी या समाजातील तळागाळातील माणसाला वर आणण्यासाठी जो त्

त्याग परिश्रम कष्ट केलेले आहे. त्या त्यागाला परिश्रमाला तोड नाही.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी जो संघर्ष केला येथील प्रस्थापित समाज व्यवस्थेला तडे देण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी जो बंडखोरीचा विद्रोहाचा विचार प्रत्येक माणसाच्या नसानसामध्ये पेरला आणि इथल्या मृदाड समाजाला जागी करून समाज परिवर्तनाच्या लढाईमध्ये सक्रिय काम केलं डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी कोणतीही रक्तरंजित क्रांती न करता आपल्या लेखणीच्या जोरावर या समाजाला भारत देशाला सुजलाम सुफलाम करण्याचं काम केलं त्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे हिमालया एवढे उपकार दलित समाज बहुजन समाज व भारतातील तमाम नागरिक हे विसरू शकणार नाहीत. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी या भारत देशातील समाज व्यवस्थेविरुद्ध विषमते विरुद्ध येथील दैववादाविरुद्ध मनुवादी संस्कृती विरुद्ध जो एल्गार पुकारलेला होता मानवाने मानवाला नाकारलेली जीवन मानवाने मानवाशी केलेले गैरवर्तन वाईट वर्तन अत्याचार कुत्र्या मांजरांना संभाळणारी आमची संस्कृती पण अण्णावाचून माणसाला जिवंत जाळणारी ही संस्कृती या संस्कृतीमध्ये परिवर्तन झालं पाहिजे. म्हणून बाबासाहेबांनी अन्यायाविरुद्ध लढण्याचे काम केलं त्या बाबासाहेबांच्या विचारासाठी अनेक लोकांनी स्वतःच्या रक्ताचे पाणी केलेला आहे. बाबासाहेबांचा विचार समाजामध्ये रुजवण्यासाठी अनेक लोकांनी हाल अपेष्टा सहन करून,अन्याय अत्याचार सहन करून,बाबासाहेबांचा विचार पुढे नेण्याचे काम केलेला आहे बीड जिल्ह्यामध्ये देखील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा विचार रुजवण्यासाठी अनेक कुटुंबीयांनी फार महत्त्वाचे योगदान दिलं आहे त्यामध्ये आदरणीय ईश्वर कागदे यांच्या कुटुंबीयांचं त्यांच्या मुलांचं फार महत्त्वाचं योगदान या समाजाला लाभलेला आहे आणि कागदे कुटुंबीयांनी अनेक वर्षापासून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ जोमाने आणि नेटानेबीड जिल्ह्यामध्ये चालवण्याचे काम केलेला आहे. नामांतराच्या लढ्यामध्ये आदरणीय पप्पू कागदे यांचं फार मोठे योगदान आहे दलित समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरुद्ध बंड एल्गार पुकारण्याचं काम कागदेकुटुंबियांनी केलेला आहे.बीड जिल्ह्यामध्ये ज्या ज्या ठिकाणी गोरगरीब सामान्य माणसावर दलीत बांधवांवर खेड्यापाड्यांमध्ये अन्याय अत्याचार झालेले आहेत ते अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी या कुटुंबीयांनी फार मोठी त्यागाची भूमिका घेतलेली आहे अनेक वेळा या कुटुंबीयांना समाजाच्या रक्षणासाठी तुरुंगाची हवा देखील खाण्याचा योग आलेला आहे.परंतु न डगमगता कोणत्याही परिणामाची चिंता न करता समाजासाठी निस्वार्थीपणाने त्यागी भावनेने योगदान देण्याचे काम या कुटुंबीयांनी केलेला आहे. परळी तालुक्यामध्ये अनेक वर्षापासून फुले आंबेडकर चळवळ जिवंत ठेवण्यासाठी अनेक लोकांचा विरोध पत्करून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची बंडखोर विद्रोहीविचारधारा घराघरांमध्ये पोहोचवण्याचे काम आदरणीय सचिन ईश्वर कागदे यांनी केलेलेआहे.ज्या ज्या ठिकाणी गोरगरीब सामान्य दलित बहिष्कृत पीडित माणसावर अन्याय अत्याचार झालेला असेल त्या अन्यायअत्याचाराला मातीत गाडण्यासाठी सचिन कागदेयांनी अनेक वर्षापासून महत्त्वाचं काम केलेलं आहे.बीड जिल्हा व परळी तालुक्यामध्ये विविध सामाजिक सांस्कृतिक आर्थिक व राजकीय प्रश्नावर नियमितपणे लढा देण्याचे काम आदरणीय सचिन भाऊ कागदे यांनी केलेला आहे. या तालुक्यामध्ये खऱ्या अर्थाने सामाजिक परिवर्तनाच्या लढाईला पाठबळ देण्याचे काम सचिन भाऊ कागदेयांनी केलेला आहे.परळी शहरात अनेक वर्षापासून दलित समाजाला जी मरगळ आलेली होती ती मरगळ दूर करून येथील कार्यकर्त्यांमध्ये स्वाभिमानाचा संचार निर्माण करण्याचे महत्त्वाचे काम आदरणीय सचिन भाऊ कागदे यांनी केलेला आहे. दलित समाजामध्ये नवचैतन्य निर्माण करून राजकीय पक्षाच्या पुढे पुढे करण्यापेक्षा आपल्या समाजातील माणसाला पुढे नेण्याचे काम आपण केलं पाहिजे यासाठी त्यांनी अनेक वर्षापासून स्वाभिमानी चळवळ जिवंत ठेवण्याचे काम सुरु केलेलं आहे.गेल्या दहा वर्षापासून परळी नगर परिषदेचे नगरसेवक म्हणून कार्यरत असताना त्यांनी आपल्या प्रभागातील नागरी समस्या सोडवण्याचे महत्त्वाचे काम केलेलं आहे तेथील रोड पथदिवे नाल्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी नळाचे कनेक्शन देण्याचे काम केलेले आहे अनेक ठिकाणी बोर मारण्याचे काम देखील त्यांनी केलेले आहे आपल्या भागातील लोकांचे आरोग्य व्यवस्थित राहावे यासाठी देखील त्यांनी करोनाच्या महामारीच्याकालखंडामध्ये अनेक लोकांना मदत करण्याचे काम केलेलं आहे.सदरच्या कालखंडामध्ये अनेक लोक भीतीने माणसाच्या जवळही जाण्याचं धाडस करत नव्हती त्या कालखंडामध्ये आदरणीय सचिन भाऊ कागदे व त्याचे मित्र मंडळांनी अनेक लोकांना जीवदान देण्याचे महत्त्वाचे काम केलेलं आहे. आपल्या प्रभागांमध्ये सर्वसामान्य माणसाचे जीवनमान सुधारण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याचं काम आदरणीय कागदे यांनी केलेला आहे. अनेक लोकांना घरकुलाचा फायदा मिळवून देण्यासाठी त्यांनी सहकार्य केलेला आहे अनेक गोरगरीब लोकांना घरकुले मिळून देऊन त्यांनी सरकारी योजनांचा सर्वसामान्य माणसाला फायदा करून देण्याचे काम केलेला आहे. आपल्या प्रभागातील अधिक लोकांच्या लेकी बाळीच्या लग्नासाठी दहा हजार रुपये त्यांनी त्यांच्या स्वखर्चेतून अनेक कुटुंबीयांना दिलेले आहेत. परळी शहरातील अनेक वस्त्यांमध्ये समाजामध्ये निर्माण झालेले वाद तंटे मिटवण्यासाठी सचिन भाऊ यांनी मेहनत घेतलेली आहे.परळी शहर पोलीस स्टेशनमध्ये दलित समाजामध्ये अनेक वेळा त्यांचे निर्माण होतात हे त्यांचे आपापसात समजू त्यानुसार



मिटवण्याचे काम देखील त्यांनी केलेला आहे अनेक गोरगरीब लोकांच्या

लेकरांना शिक्षण मिळावे म्हणून त्यांना शालेय मदत करण्याचे काम तसेच गोरगरीब लोकांच्या लेकींचा लग्नाचा प्रश्न सोडवण्याचा काम देखील आदरणीय सचिन भाऊ कागदे यांनी केलेला आहे. आपल्या वडील आदरणीय ईश्वर जी कागदे यांच्या कार्याचा सर समाजाला पडू नये म्हणून त्यांच्या नावे स्मृतीशेष ईश्वर कागदे राज्यस्तरीय डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार समाजातील विविध क्षेत्रांमधील लोकांनी उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल त्यांना समृद्धी चषक प्रशस्तीपत्रक देऊन त्यांनी समाजामध्ये पुन्हा जोमाने कार्यास लागावे म्हणून हा पुरस्कार दोन वर्षापासून देण्याचे सुरु केलेले आहे. परळी शहरांमध्ये लोकांच्या जीवावर जयंती साजरी करण्यापेक्षा लोकांना वर्गणी मागण्यापेक्षा आपण आपल्या स्वतःच्या स्वबळावर जयंती साजरी करु शकतो याचे उदाहरण देऊन त्यांनी चार-पाच वर्षापासून स्वतःच्या पैशाने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी करून लाखो रुपयाचा डॉल्बी लावून या समाजासाठी आम्हीही मागे नाहीत हा संदेश देण्याचे काम केलेला आहे परळी शहरांमध्ये आदर्श शिंदे यांचा सर्वात प्रथम भीम गीतांचा कार्यक्रम त्यांनी स्वतःच्या कमाईतूनच परळी शहरात साजरा करून दाखवण्याचे काम केलेलं आहे .त्यानंतर अजय देहाडे चेतन चोपडे यांच्यासारख्या ख्यातनाम गायकांना बोलवून समाजामध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने त्यांचे कार्यक्रम स्वखर्चाने घेण्याचे काम देखील आदरणीय सचिन भाऊ कागदे यांनी केलेला आहे.आपण आज ज्या पदावर आहोत आज आपण समाजामध्ये ची प्रतिष्ठा मिळवलेली आहे त्या प्रतिष्ठेच्या मागे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या समाज आहे याची जाणीव ठेवून या समाजाला फुल नाही फुलाची पाकळी म्हणून आपण काहीतरी योगदान दिले पाहिजे आपल्या समाजासाठी 20% दान करण्याची दानत ठेवली पाहिजे म्हणून आदरणीय सचिन भाऊ कागदे यांनी समाजासाठी तन-मन-धनाने काम करण्याचे कार्य सुरु ठेवलेला आहे. समाजासाठी कार्य करत असताना अनेक लोकांचा विरोध देखील पत्करावा लागतो अनेक वेळा विनाकारण बदनामी ही पत्करावी लागते राजकीय लोकांच्या रोशाचा बळीही पडावा लागतो तरीपण आपण आपल्या समाजासाठी लढले पाहिजे हा मंत्र सांगणारा समाज कार्य करत असताना समाजातीलच काही माणसे आपल्याला विरोध करत असतात.आपण लोकांचे किती भलं केलं तरी अनेक लोकांच्या पोटात पोटशुळ उठतो याची जाणीव असतानाही आपण आपलं कार्य चालूच ठेवलं पाहिजे कितीही अडथळे आले कितीही संकटे आली तरी आपण आपलं कार्य सोडायचं नाही हा मंत्र ध्यानात घेऊन आदरणीय सचिन भाऊ कागदे यांनी समाजाच्या भल्यासाठी उन्नतीसाठी प्रगतीसाठी सामाजिक कार्य सुरु ठेवलेला आहे.त्याला परळीच्या इतिहासात तोड नाही आदरणीय सचिन भाऊ कागदे यांचं कार्य खरोखरच उल्लेखनीय असं कार्य आहे समाजाच्या हितासाठी सचिन भाऊ कागदे हे 24 तास उपलब्ध आहेत ज्या ज्या ठिकाणी गोरगरीब सामान्य माणसावर अन्याय अत्याचार होत असेल त्यावेळी त्यांच्या अन्यायाला प्रतिउत्तर देण्यासाठी सचिन भाऊ नेहमीच हजर झालेले आहेत.समाजासाठी आपण योगदान दिलेच पाहिजे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेला आपण बेईमान न होता आपल्या समाजाला योगदान दिले पाहिजे समाजाच्या पाठीमागे उभे राहिले पाहिजे हा मंत्र ध्यानात धरून आदरणीय सचिन भाऊ कागदे यांनी वेळोवेळी समाजसेवेसाठी समाजासाठी त्या केलेला आहे समाजासाठी आपण पुढे आलं पाहिजे बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा पुढे नेण्यासाठी आपण कार्यरत झालं पाहिजे या मताचा असलेला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरा ंचा विचार हा दलित माणसाचा श्वास आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हा जरी त्यांचा श्वास आहे. आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा जोपर्यंत चंद्र सूर्य तारे आहेत तोपर्यंत ती जिवंत ठेवण्यासाठी प्रत्येक भीमसैनिकांनी पुढे आलं पाहिजे बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराला जो माणूस गद्दार होईल त्या माणसाचे आयुष्यात कधीच चांगलं होणार नाही याची जाणीव ठेवून प्रत्येक माणसाने बाबासाहेबांचा विचार पुढे नेण्याचं काम केलं पाहिजे या मताचा असलेला प्रचंड कट्टर भीमसैनिक भीम आणि बाबासाहेबांची विचारधारा घराघरांमध्ये पोहोचवणारा स्वाभिमानी समाजसेवक, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वाभिमानी बंडखोरी विचारांची ज्योत सदैव तेव्हा ठेवण्याचे काम करणारा फुले आंबेडकरी चळवळीला खऱ्या अर्थाने परळी शहरांमध्ये जिवंत ठेवण्याचे काम करणारा लाचार्य दलाली भडवेगिरी करणाऱ्या कार्यकर्त्यांना स्वाभिमान शिकवण्याचं काम करणारा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी या समाजासाठी जी योगदान दिलेला आहे त्या योगदानाचा विसर न पडता प्रत्येक युवकांनी समाजाच्या कार्यासाठी हितासाठी संरक्षणासाठी पुढे आलं पाहिजे या मताचा असलेला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी या समाजाला जो शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मंत्र दिला त्या मंत्रासाठी प्रत्येकाने पुढाकार घेतला पाहिजे घराघरांमध्ये शिक्षित माणूस झाला पाहिजे घराघरांमध्ये शिक्षणाची ज्योत पेटली पाहिजे घराघरांमध्ये कार्यकर्ता निर्माण होण्यापेक्षा एक अधिकारी निर्माण झाला पाहिजे.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार धारेला जागून प्रत्येक माणसाने या समाजाला निस्वार्थीपणाने योगदान देण्याचे काम केलं पाहिजे.शिक्षणाच्या माध्यमातून मोठ्या पदावर जाऊन समाजाचे कुटुंबाचेव देशाचे ऋण फेडण्याचे काम प्रत्येक माणसाने केलं पाहिजे.म्हणून स्वाभिमानाने जगा बाबासाहेबांचा विचार कोणाच्या दावणीला ठेवू नका हा मंत्र सांगणारा, आदरणीय सचिन भाऊ कागदेयांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त कोटी कोटी हार्दिक शुभेच्छा. जय भीम जय प्रबुद्ध भारत.



**ॲड.दिलिप उजगरे**

## समाजसेवेपेक्षा सत्तासेवेचे आकर्षण वाढतेय का?

**डॉ. भारत कऱ्हाड**

समाजसेवा आणि सत्ता यांचा संबंध नेहमीच गुंतागुंतीचा राहिला आहे. समाजसेवा ही समाजातील समस्या समजून घेऊन त्यावर उपाय शोधण्याची प्रक्रिया आहे, तर सत्ता ही निर्णय घेण्याची आणि त्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याची क्षमता आहे. त्यामुळे समाजसेवा आणि सत्ता यांच्यात मूलभूत विरोध नाही. उलट, अनेक वेळा समाजपरिवर्तनासाठी या दोन्हींची आवश्यकता असते. मात्र गेल्या काही वर्षांत समाजजीवनात एक वेगळी प्रवृत्ती दिसून येत आहे. समाजसेवेपेक्षा सत्तासेवेचे आकर्षण वाढत असल्याची भावना अनेकांच्या मनात निर्माण झाली आहे. या बदलामागील कारणे आणि त्याचे परिणाम समजून घेणे आवश्यक आहे.

एक काळ असा होता की समाजासाठी काम करणाऱ्या अनेक व्यक्ती कोणत्याही राजकीय पदाची अपेक्षा न ठेवता आयुष्यभर कार्यरत राहत असत. गावोगावी शिक्षणासाठी झटणारे शिक्षक, सहकारी चळवळीतील कार्यकर्ते, सामाजिक सुधारक, स्वयंसेवी संस्थांचे सेवक, रक्तदान आणि आरोग्य क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते किंवा अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारे सामाजिक नेते यांची ओळख त्यांच्या कार्यामुळे होत असे. त्यांना पदापेक्षा लोकांचा विश्वास महत्त्वाचा वाटत असे. समाजातील प्रश्न सोडविणे हेच त्यांचे ध्येय असे. आजही अशा व्यक्ती समाजात आहेत, परंतु त्यांच्या तुलनेत सत्तेच्या जवळ जाण्याची इच्छा अधिक प्रबळ होत असल्याचे दिसते.

यामागे सर्वात मोठे कारण म्हणजे सत्तेचे वाढलेले महत्त्व. आजच्या काळात विकासकामे, निधी, योजना, प्रशासकीय निर्णय आणि सार्वजनिक संसाधनांचे वाटप यामध्ये सत्तेची भूमिका अत्यंत महत्त्वाची झाली आहे. त्यामुळे अनेक सामाजिक कार्यकर्त्यांना असे वाटू लागते की केवळ मागण्या करून किंवा आंदोलने करून प्रश्न सुटत नाहीत. निर्णय घेणाऱ्या व्यवस्थेचा भाग झाल्याशिवाय मोठे परिवर्तन घडवून आणणे कठीण आहे. ही भावना काही प्रमाणात वास्तववादी देखील आहे. त्यामुळे समाजकारणातून राजकारणाकडे जाणारा प्रवास वाढताना दिसतो.

परंतु या प्रवासामागे केवळ समाजहिताची भावना असते असे नाही. सत्तेमुळे मिळणारी प्रसिद्धी, प्रतिष्ठा, प्रभाव आणि सामाजिक मान्यता यांचेही आकर्षण असते. आजच्या माध्यमकेंद्री युगात राजकीय व्यक्तींना मिळणारे महत्त्व समाजसेवकांच्या तुलनेत खूप जास्त आहे. एखाद्या सामाजिक कार्यकर्त्याने वर्षानुवर्षे केलेले काम अनेकदा दुर्लक्षित राहते, परंतु एखाद्या राजकीय नेत्याचे छोटेसे वक्तव्यदेखील मोठी बातमी बनते. परिणामी अनेकांना समाजसेवेपेक्षा सत्ता आणि राजकीय ओळख अधिक प्रभावी वाटू लागते.

सोशल मीडियाने या प्रवृत्तीला आणखी वेग दिला आहे. आज प्रत्येक कार्य सार्वजनिक प्रतिमेशी जोडले गेले आहे. अनेकदा सेवा कार्यापेक्षा त्याचे छायाचित्र, व्हिडिओ किंवा प्रसिद्धी अधिक चर्चेत येते. काही जण समाजसेवा करतात म्हणून प्रसिद्ध होतात, तर काही जण प्रसिद्ध होण्यासाठी समाजसेवा करतात, अशी टीका ऐकायला मिळते. अर्थात ही टीका सर्वांवर लागू होत नाही; परंतु बदलत्या सामाजिक मानसिकतेचे ती एक संकेतक आहे. समाजहितासाठी केलेले कार्य आणि स्वतःची प्रतिमा उभारण्यासाठी केलेले कार्य यामधील सीमा काही वेळा अस्पष्ट होताना दिसते.

अर्थातच समाजसेवा करणारे लोक पूर्णपणे कमी झाले आहेत असे म्हणणे अन्यायकारक ठरेल. आजही हजारो स्वयंसेवक विविध क्षेत्रांमध्ये निःस्वार्थपणे कार्यरत आहेत. पूर, भूकंप, महामारी किंवा इतर संकटांच्या काळात मदतीसाठी सर्वप्रथम धावून जाणारे अनेक लोक कोणत्याही पदाची अपेक्षा न ठेवता काम करताना दिसतात. रक्तदान, अवयवदान, पर्यावरण संरक्षण, शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक न्याय यांसारख्या क्षेत्रांमध्ये अनेक व्यक्ती शांतपणे कार्य करत आहेत. मात्र त्यांच्या कार्याला मिळणारी प्रसिद्धी तुलनेने कमी असल्यामुळे समाजात वेगळे चित्र निर्माण होते.

लोकशाही व्यवस्थेमध्ये समाजसेवा आणि राजकारण या दोन्हींची गरज आहे. समाजसेवक समाजातील वास्तव समजून घेतात, तर राजकीय नेतृत्व त्या वास्तवावर आधारित धोरणे तयार करु शकते. परंतु जेव्हा समाजसेवा ही केवळ सत्तेपर्यंत पोहोचण्याची पायरी बनते, तेव्हा तिच्या मूलभूत उद्देशाला धक्का बसतो. समाजसेवेचा आत्मा म्हणजे लोकांच्या वेदना समजून घेणे, त्यांच्या समस्या स्वतःच्या मानणे आणि त्यावर उपाय शोधण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे. ही भावना टिकून राहिली तर सत्ता लोककल्याणाचे प्रभावी साधन ठरु शकते. परंतु सत्ता हेच अंतिम ध्येय बनले तर समाजहित मागे पडण्याची शक्यता असते.

आजच्या तरुण पिढीसमोरही हा महत्त्वाचा प्रश्न उभा आहे. समाजासाठी काम करायचे की सत्तेच्या माध्यमातून प्रभाव निर्माण करायचा, हा निवडीचा प्रश्न नाही; तर दोन्हींचा समतोल साधण्याचे आव्हान आहे. समाजाला चांगल्या राजकारण्यांची गरज आहेच, पण त्याचबरोबर सत्तेच्या बाहेर राहून लोकहिताचे भान जपणाऱ्या जागरूक नागरिकांची आणि निःस्वार्थ समाजसेवकांचीही गरज आहे. कारण लोकशाही केवळ सत्ताधाऱ्यांवर टिकत नाही; ती समाजाच्या सजगतेवरही टिकते.

आज सत्तेचे आकर्षण वाढले आहे, हे वास्तव नाकारता येणार नाही. मात्र त्याचवेळी समाजसेवेची गरजही पूर्वीइतकीच महत्त्वाची आहे. समाजाचा विकास केवळ अधिकार आणि पदांमुळे होत नाही; तो संवेदनशीलता, त्याग, सेवा आणि लोकहिताच्या भावनेमुळे घडतो. म्हणूनच सत्तेच्या स्पर्धेच्या या काळात समाजसेवेची ज्योत जिवंत ठेवणे ही प्रत्येक सजग नागरिकाची जबाबदारी आहे. सत्ता बदलत राहते, पदे येतात आणि जातात, पण समाजासाठी केलेले निःस्वार्थ कार्य मात्र कायम स्मरणात राहते. इतिहासात अनेक सत्ताधारी विस्मरणात गेले, परंतु समाजासाठी जगणारे सेवाभावी लोक आजही आदराने स्मरणात आहेत. त्यामुळे प्रश्न सत्ता मिळविण्याचा नाही, तर सत्ता आणि समाजसेवा यांपैकी कोणाला प्राधान्य दिले जाते याचा आहे. समाजहित सर्वोच्च राहिले, तर सत्ता देखील लोककल्याणाचे साधन ठरते; पण समाजहित बाजूला पडले, तर सत्तेचे आकर्षण लोकशाहीच्या मूल्यांनाच कमकुवत करू शकते.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

लाभाची योजना राबविण्यात येत आहे. ही योजना मेंढपाळ बचत गट किंवा सहकारी संस्थांना सामूहिक स्वरूपात दिल्यास एका ठिकाणी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करता येतील. त्यामुळे मेंढपाळांचे वारंवार होणारे स्थलांतर कमी होऊन त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक प्रगतीला चालना मिळू शकते, असे त्यांनी यावेळी सांगितले.कृषी मंत्री दत्ता भरणे यांनीही या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

-----------------------------------

शिक्षण विभागाचे सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, एससीईआरटीचे संचालक हेमंत वसेकर यांच्यासह एसबीआय बँक,बंधन बँक फाऊंडेशन तसेच फिरोदीया फाऊंडेशन आणि शांतीलाल मुथ्था फाऊंडेशन या भागीदार संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शिक्षण क्षेत्रात केवळ अभ्यासक्रम महत्त्वाचा नसून शिक्षकांची अध्यापन पद्धती, विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची क्षमता आणि त्यांच्यात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याची भूमिका अधिक महत्त्वाची आहे. मूल्यवर्धन कार्यक्रमांतर्गत शिक्षकांना दिले जाणारे प्रशिक्षण विद्यार्थ्यांमधील भीती, संकोच आणि शंका दूर करण्यास मदत करत असून ज्ञानार्जनाची प्रक्रिया अधिक प्रभावी बनवत आहे. हे लक्षात घेऊन कार्यक्रमाच्या पुढील टप्प्यांची अधिक प्रभावी अमंलबजावणी करावी.शिक्षण विभाग, प्रशिक्षण संस्था आणि भागीदार संघटनांनी समन्वयाने काम करून शिक्षणाची गुणवत्ता अधिक उंचावण्यासाठी प्रयत्न सुरु ठेवावेत. विद्यार्थ्यांना केवळ गुणवंत नव्हे तर सजग, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक बनविण्यासाठी मूल्य शिक्षणाची चळवळ येत्या काळात व्यापक करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री यांनी केले.

मंत्री दादाजी भुसे म्हणाले की, या उपक्रमामुळे विद्यार्थी आणि पालकांचा सहभाग वाढत असून शाळांमध्ये लक्षणीय बदल घडत आहे. शिक्षकांमध्ये सकारात्मक दृष्टीकोन विकसित करण्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, संवादकौशल्य आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याची राज्यासह देशपातळीवर दखल घेतली जात आहे.

-----------------------------------

परीक्षा कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर तसेच जिल्हास्तरीय समन्वयक ऑनलाइन उपस्थित होते. या बैठकीत सर्व जिल्ह्यातील सीईटी विद्यार्थी सहाय्यता केंद्राचा आढावा घेण्यात आला. उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्यासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यावर विश्वासार्ह माहिती, अचूक मार्गदर्शन सहजपणे त्यांच्या जिल्ह्यातच उपलब्ध व्हावे यासाठी विद्यार्थी सहाय्यता केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. तसेच ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील कामांसाठी वारंवार मोठ्या शहरांमध्ये जाण्याची आवश्यकता भासू नये, त्यांना प्रवेश प्रक्रियेची सविस्तर माहिती, विविध शिष्यवृत्ती योजनांची माहिती तसेच आवश्यक मार्गदर्शन त्यांच्या जिल्ह्यातच उपलब्ध व्हावे, या हेतूने ही केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत.

-----------------------------------

उष्णतेचा कहर लक्षात घेता या विभागातील शाळा 22 जून पासून सुरु होणार आहेत. सरकारने आपल्या परिपत्रकात नेमकं काय म्हटलं ते सविस्तर जाणून घेऊयात.शिक्षण विभागाकडून राज्यातील शाळा सुरु करण्याबाबत परिपत्रक जारी करण्यात आले आहे. यात शिक्षण विभागाने म्हटले की, उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये शासनाने संपूर्ण राज्यातील राज्य मंडळाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या उन्हाळी सुटीच्या कालावधीमध्ये एकवाक्यता व सुसंगती आणण्यासाठी सूचना निर्गमित केलेल्या आहेत.या अनुषंगाने राज्यातील राज्य मंडळाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा सन 2026 ची उन्हाळी सुटी व शैक्षणिक वर्ष 2026-27 सुरु करण्याबाबत संदर्भ क्र. 2 अन्वये राज्यातील सर्व राज्य मंडळाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा सोमवार दि. 15 जून, 2026 पासून सुरु करण्याबाबत कळविण्यात आले होते.विदर्भाचे तापमान विचारात घेता उन्हाळ्याच्या सुटी व नियमित शाळा सुरु करण्याबाबत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण समितीने रिट याचिका दाखल करण्यात आली होती. त्यानुषंगाने कळविण्यात येते की, अर्धाधिक दिवसांतील तापमान हे विद्यार्थ्यांच्या आरोग्यास धोकादायक ठरु नये यासाठी निर्देशानुसार येत आहे. त्यामुळे फक्त विदर्भातील राज्य मंडळाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा सोमवार दिनांक 22 जून, 2026 पासून सुरु होतील. तसेच दि. 22 जून 2026 ते 30 जून 2026 या कालावधीत शाळा सकाळच्या सत्रात भरतील व दि. 1 जुलै 2026 पासून शाळा नियमित वेळेत भरतील. उर्वरित राज्यात मात्र शाळा सोमवार दि. 15 जून, 2026 पासून नियोजित वेळेत सुरु होतील याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

-----------------------------------

निर्णयाविरोधात पत्रकार संघटना आक्रमक झाल्या आहेत.

या संदर्भात माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांनी पुढाकार घेत पत्रकार गृहनिर्माण संस्थेच्या नियोजित जागेवर 11 जून रोजी सकाळी 10.30 वाजता भूमिपूजन व फलक उभारणीचा कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमास परिसरातील सर्व पत्रकार, संपादक व पत्रकार संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

पत्रकार संघटनांच्या प्रतिनिधींनी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, पत्रकारांसाठी मंजूर करण्यात आलेली जागा कायम ठेवावी आणि या संदर्भातील सर्व निर्णय पारदर्शकपणे जनतेसमोर मांडावेत, अशी मागणी केली आहे. तसेच एकीकडे जागा मंजूर करून दुसरीकडे त्याच जागेचा अन्य कारणांसाठी वापर करण्याचा प्रयत्न हा पत्रकारांची दिशाभूल करणारा प्रकार असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

या घडामोडींमुळे परळी शहरात विविध चर्चांना उधाण आले असून, नगरपालिका प्रशासन आणि संबंधित पदाधिकाऱ्यांनी याबाबत स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी नागरिक व पत्रकारांकडून केली जात आहे.

पत्रकारांच्या हक्काच्या जागेवर नेमका कुणाचा डोळा आहे? आणि लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाला न्याय मिळणार का? याकडे आता संपूर्ण परळीकरांचे लक्ष लागले आहे.

-----------------------------------

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय आधार नोंदणी समितीची बैठक पार पडली. याप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, विस्तार अधिकारी आर.सी. खोड, जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक महेश गोले, महाआयटीचे जिल्हा समन्वयक मनोजकुमार गुंड यांची प्रमुख तर आधार प्राधिकरणाचे उपसंचालक मंदार जेवरे, कुलदीपसिंग गेहलोत यांची ऑनलाईन उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्री. जॉन्सन म्हणाले की, शाळा सुरु होण्यापूर्वीच प्रत्येक तालुकानिहाय आणि शाळानिहाय आधार शिबिरांचा एक ठोस मास्टर प्लॅन तयार करावा. ज्या शाळा 15 जूनपासून नियमित सुरु होत आहेत, त्याच ठिकाणी या विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात यावे, जेणेकरून विद्यार्थ्यांना किंवा पालकांना इतरत्र जाण्याची गरज पडणार नाही. तसेच यामध्ये वय 5 आणि 15 वर्ष पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे बायोमॅट्रिक अद्ययावतीकरण करण्यावर विशेष भर दिला जावा. संपूर्ण प्रक्रिया राबविताना शासनाने घालून दिलेल्या सर्व नियमांचे व निर्देशांचे काटेकोरपणे पालन केले जावे.

अनेक शासकीय योजना, शिष्यवृत्ती आणि शैक्षणिक प्रक्रियांसाठी विद्यार्थ्यांचे आधार कार्ड लिंक असणे आणि ते अद्ययावत असणे अत्यंत आवश्यक आहे. शाळा सुरु होताच पहिल्या दिवसापासूनच या मोहिमेला गती दिल्यास कोणताही विद्यार्थी शासकीय लाभांपासून वंचित राहणार नाही, असा विश्वासही जिल्हाधिकारी श्री.जॉन्सन यांनी यावेळी व्यक्त केला आहे. तसेच सध्या सुरु असलेल्या सीबीएसई तसेच आयसीएसई शाळेत आजपासून नियोजन करुन शिबीराचे आयोजन करावे. भारतीय पोस्ट खात्याने त्यांच्याकडे उपलब्ध असलेले ग्रामीण डाकसेवक यांच्यामार्फत या कामात मदत करावी, अशी सुचनाही त्यांनी केली.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी महिला व बाल विकास, शिक्षण, भारतीय टपाल खाते, जिल्हा आरोग्य विभाग यासह सर्व संबंधित यंत्रणांनी परस्परांशी समन्वय ठेवून हा मास्टर प्लॅन तात्काळ अंमलात आणण्याचे आदेश दिले असून, हलगर्जीपणा करणाऱ्यांवर कारवाईचा इशाराही दिला आहे.

-----------------------------------

आणि अध्यात्मिक अभ्यासकांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या दुर्मिळ 'संत जगमित्रनागा अभंग गाथे'चे प्रकाशन माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या हस्ते परळीतील जगमित्र कार्यालयात संपन्न झाले.

संत साहित्याचे अभ्यासक व संत जगमित्र नागा चरित्र ग्रंथाचे लेखक ह.भ. प. ॲड. दत्तात्रय आंधळे संपादित या गाथेमध्ये संत जगमित्रनागा यांच्या दुर्मिळ अभंगांचा समावेश करण्यात आला असून त्यांचा सोपा भावार्थही देण्यात आला आहे. त्यामुळे वारकरी संप्रदायातील अभ्यासक, कीर्तनकार, प्रवचनकार तसेच संत साहित्यप्रेमींसाठी हा ग्रंथ अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

संत साहित्याचे अभ्यासक व साहित्यिक ॲड. दत्तात्रेय आंधळे यांनी या गाथेचे लेखन केले आहे. यापूर्वीही त्यांनी विविध चरित्रग्रंथ प्रकाशित केले असून संत साहित्य क्षेत्रात त्यांचे विशेष योगदान राहिले आहे. संत जगमित्रनागा यांचे जीवनकार्य, अध्यात्मिक विचार आणि अभंग साहित्याचा व्यापक प्रसार व्हावा या उद्देशाने हा ग्रंथ प्रकाशित करण्यात आला आहे.परळी वैजनाथ येथील संत जगमित्रनागा यांच्या चरित्रासह त्यांच्या अभंगांचा अभ्यासपूर्ण आढावा या गाथेत घेण्यात आला आहे. त्यामुळे संत साहित्य क्षेत्रातील ही एक दुर्मिळ आणि अभ्यासपूर्ण ग्रंथसंपदा ठरणार असल्याचे मत आ धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले.

या प्रकाशन कार्यक्रमास युवक नेते अजय मुंडे, माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, न. प. गटनेते वैजनाथ सोळंके, राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष अयुब खान पठाण, पत्रकार प्रा. रविंद्र जोशी, गोविंद केंद्रे, सदाशिव देशपांडे, बाबुराव रुपनर यांच्यासह अनेक पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

-----------------------------------

मिळणे परंतु तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी केवळ 354.25 क्विंटलच बियाणे मिळाले,त्यामुळे उर्वरित 628 .75 ची आवश्यकता असताना सदरील बियाणे महाबीज कडून मिळाले नाही,त्याच बरोबर तालुका कृषी अधिकारी कार्यालयाने उर्वरित बियाणाची मागणी सुद्धा आज पर्यंत केली नाही,परळी तालुक्यासाठी 1)संजय कृषी सेवा केंद्र,परळी वै.2)रुक्मिणी ट्रेडर्स परळी वै.3)किसान सेंटर परळी वै.व 4)बालाजी कृषी सेवा केंद्र,सिरसाळा हे चार कृषी सेवा केंद्र अधिकृत आहेत,परंतु या केंद्रांना प्रत्येकी किती बियाणे दिले ? कोणत्या शेतकऱ्याने कोणत्या कृषी सेवा केंद्रावर जाऊन बियाणे घ्यायचे याचे नियोजन करण्यात आले नाही असे असताना फक्त ऑफलाईन परमिट देऊन शेतकऱ्यांना कृषीसेवा केंद्रावर पाठवले त्यामुळे तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या ढिसाळ नियोजनामुळे शेतकऱ्याना मागील 5 दिवसात दररोज परळीत येऊन त्रास सहन करावा लागला,त्यामुळे शेकडो संतप्त शेतकऱ्यानी आज 9 जून रोजी सकाळी 10 वाजता कृषी अधिकारी कार्यालयात जाऊन तालुका कृषी अधिकारी कार्यालयात ठिय्या आंदोलन केले,त्यावेळी आम्हाला का बियाणे मिळाले नाही याचा जाब तालुका कृषी अधिकारी यांना शेतकऱ्यांनी विचारले असता आम्ही काय करावे ? जेवढे बियाणे आले तेवढे वाटप केले ? आमच्याकडे काहीच नाही? तुम्हीच महाबीज च्या अधिकाऱ्याना बोला,त्यावेळी शेतकऱ्यानी आंदोलनावर ठाम राहण्याचा निर्णय घेतला त्यावेळी तालुका कृषी अधिकारी यांनी सांगितले आणखी काही बियाणे उपलब्ध होईल त्यासाठी यादी बनवून घेतली व सर्व शेतकऱ्याना बियाणे दिले जाईल असे सांगितले व जिल्हा अधीक्षक कृषी,बीड यांना पत्र देऊन उर्वरित 628.75 क्विंटल ची मागणी लेखी पत्रा द्वारे केली,त्यावेळी शेतकऱ्यांनी आंदोलन स्थगित केले,परंतु हे आंदोलन केल्यावरच जाग येऊन उर्वरित बियाणाची का मागणी केली ? या अगोदर मागणी का केली नाही असा सवाल शेतकऱ्यानी उपस्थित केला आहे,यावेळी सिद्धेश्वर मुंडे,नामदेव गित्ते,चंद्रहास गित्ते,शामसुंदर गित्ते,तुकाराम गित्ते,रामप्रभू गित्ते यांच्यासह परळी तालुक्यातील अनेक गावातील शेतकरी उपस्थित होते.

-----------------------------------

लपवलेला धोंडा एका घासात फस्त केला!

क्षणात आनंदाच्या वातावरणात खळबळ उडाली. सासूबाईंच्या चेहऱ्यावरील आनंद गायब झाला आणि घरातील पुरुष मंडळींनी तातडीने मांजराचा शोध घेतला. काही वेळातच आरोपी मांजराला पकडून एका सुरक्षित ठिकाणी बांधण्यात आले. मात्र तोपर्यंत अंगठीचा पुरावा त्याच्या पोटात जमा झाला होता. दरम्यान, जावईबापूंना सुरुवातीला काहीच कळले नाही. मात्र घरातील धावपळ पाहून त्यांनी चौकशी केली. त्यानंतर त्यांना संपूर्ण प्रकार सांगण्यात आला. अखेर अंगठी नंतर देण्याचे आश्वासन देत जावईबापूंचा मान राखण्यात आला आणि कपडे देऊन त्यांची बोळवण करण्यात आली.यानंतर सुरु झाला अंगठी परत मिळविण्याचा खरा संघर्ष. पुढील चार दिवस मांजरावर बारीक लक्ष ठेवण्यात आले. "आज बाहेर पडेल, उद्या बाहेर पडेल," या आशेवर घरच्यांनी पहारा दिला. पण अंगठी काही हाती लागली नाही. उलट मांजर मात्र निर्धास्तपणे फिरत राहिले.अखेर घरच्यांनी पशुवैद्यकांचा सल्ला घेतला. मांजराला उलटी होण्यासाठी औषध देण्यात आले. मात्र दुर्दैवाने उपचारादरम्यान मांजराचा मृत्यू झाला. त्यामुळे अंगठी परत मिळेल की नाही, याबाबत संभ्रम निर्माण झाला. शेवटी पशुवैद्यकीय शस्त्रक्रियेद्वारे मृत मांजराच्या पोटाची तपासणी करण्यात आली आणि सर्वांना ज्याची प्रतीक्षा होती ती सोन्याची अंगठी अखेर सुरक्षित अवस्थेत सापडली. अंगठी मिळाली खरी; पण त्यासाठी एका मुक्या जीवाचा बळी गेल्याने कुटुंबीयांमध्ये हळहळही व्यक्त करण्यात आली.या अजब-गजब घटनेची चर्चा सध्या टाकरवण परिसरात चांगलीच रंगली आहे. जावयाचा आहेर, सोन्याची अंगठी, धोंडा आणि मांजर यांचा हा अनपेक्षित संगम गावकऱ्यांसाठी चर्चेचा विषय ठरला आहे.

## पान 4 वरुन

रोजी या सर्व माजी क्रिकेटपटू असलेल्या मित्रांनी माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी यांच्या बाजीराव क्रिकेट मैदानावर एक 12 षटकांचा रंगतदार सामना खेळला. यामध्ये निळकंठ चाटे व साजिद शेख यांच्या संघात खेळाडूंची विभागणी करून बारा षटकांचा सामना झाला. अनेकांनी पन्नाशी पार केलेली असल्यामुळे मैदानावरही अनेक गमती जमती पाहायला मिळाल्या. तरी सर्वांनी उत्साहाने मैदानावर क्रिकेटचा आनंद लुटला. हा सामना साजिद यांच्या संघाने जिंकला परंतु जिंकल्याचा आनंद दोन्ही संघांनी तितक्याच उत्साहाने साजरा केला. जे खेळाडू मैदानात उतरले होते त्यापैकी अनेकांनी विद्यापीठ संघात तसेच जिल्हा आणि विभागीय संघात प्रतिनिधित्व केलेले होत या खेळाडूमध्ये नगरसेवक निळकंठ चाटे, रानबा गायकवाड, अजय जोशी, साजिद शेख, सचिन सूर्यवंशी,बालाजी वाघ, अनिल जठार, नरसिंग देशमुख, महेंद्र ठाकूर, श्याम काकडे, मसरत शेख, वाजिद शेख, संजय देवधर, चंद्रकांत शिंदे, सचिन जोशी, संजय वानखेडे, सचिन ठाकूर, चंद्रकांत वाघमारे , पापा सिंग भाटिया, पापासिह ठाकूर, बबलू रोडगे, अनिल जाधव, विकी अवस्थी, गणेश केंद्रे, क्षणिक गीते, मकरंद नरवणे यांच्यासह 25 ते 30 खेळाडू सहभागी झाले होते. सर्व खेळाडूंच्या पांढऱ्या टी-शर्टची व्यवस्था निळकंठ चाटे यांनी केली होती. क्रिकेट सामना संपल्यानंतर डिंपी भाटिया यांनी सर्व खेळाडूंसाठी संगम येथील त्यांच्या शेतातील फार्म हाऊसवर स्नेहभोजन दिले. या भोजनाचा सर्व खेळाडूंनी आस्वाद घेतला. शारीरिक तंदुरुस्तीसाठी व्यसनापासून दूर राहावे आणि सामाजिक व राष्ट्रीय ऐक्यासाठी मैदानी खेळ महत्त्वाचा असल्याचे या गेट-टुगेदर च्या माध्यमातून खेळाडूंनी नव्या पिढीच्या तरुणांना दिला आहे.

-----------------------------------

लाभार्थ्यांची नावे आणि उपलब्ध साठ्याची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.दरम्यान, या आरोपांबाबत संबंधित कृषी सेवा केंद्र चालक व कृषी विभागाचे अधिकृत स्पष्टीकरण मिळू शकले नाही. मात्र शेतकऱ्यांच्या तक्रारींची सखोल चौकशी करुन सत्य बाहेर आणण्याची गरज व्यक्त होत आहे.कृषी सेवा केंद्र चालकावर नातेवाईकांना रात्रीच बियाणे वाटप केल्याचा आरोप

-----------------------------------

काल दिवसभरात 50 हून अधिक घरकूल लाभार्थ्यांची चौकशी पूर्ण झाली असून, या तपासणीचा अहवाल आज जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द होण्याची शक्यता आहे.चौकशीत समोर आले की, काही लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांचे पैसे मिळवून देतो, असे आमिष दाखवून त्यांच्याकडून ओटीपी घेण्यात आले. याच नावावर बनावट नोंदी करुन वाळू उपसल्याचे दाखवण्यात आले. इतकेच नव्हे, तर शासनाची ईटीपी प्रणालीही बोगस तयार करुन त्यात खोट्या नोंदी टाकण्यात आल्याचे उघड झाले आहे.शासकीय रेकॉर्डनुसार आतापर्यंत सुमारे 3 हजार ब्रास वाळू लाभार्थ्यांना वाटप केल्याचे दाखवण्यात आले आहे. मात्र ईटीएस अहवालातून प्रत्यक्षात 20 हजार ब्रासपेक्षा अधिक वाळूचा उपसा झाल्याचे स्पष्ट झाले आहे. म्हणजेच प्रत्यक्ष उपसा आणि कागदोपत्री नोंदी यामध्ये मोठी तफावत आहे.या प्रकरणात ज्या वाहनांद्वारे वाळूची वाहतूक करण्यात आली, ती वाहने जप्त करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच संबंधितांवर कोट्यवधी रुपयांचा दंड आकारण्याची शक्यताही वर्तवली जात आहे. आज संध्याकाळपर्यंत जिल्हाधिकारी स्तरावर मोठी प्रशासकीय कारवाई होऊ शकते, अशा हालचाली जिल्हा महसूल प्रशासनात सुरु आहेत. या कारवाईमुळे वाळू माफियांसह काही महसूल आणि पोलीस कर्मचाऱ्यांचेही धाबे दणाणले जाणार आहेत.

-----------------------------------

भाषणे, सोशल मीडिया पोस्ट, पत्रकार परिषद किंवा इतर सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये कोणताही राजकीय नेता अथवा पक्ष दिव्यांग व्यक्तींबाबत अवमानकारक भाषा वापरत असल्यास त्याविरोधात तक्रार केली जाऊ शकते. अशा प्रकरणांमध्ये निवडणूक आयोग, पोलीस प्रशासन तसेच दिव्यांग कल्याण विभागाकडे दाद मागण्याची तरतूद आहे.कायद्यातील तरतुदीभारतामध्ये लागू असलेल्या Rights of Persons with Disabilities Act, 2016 अंतर्गत दिव्यांग व्यक्तींच्या सन्मान, समानता आणि अधिकारांचे संरक्षण करण्यात आले आहे. कोणत्याही प्रकारचा भेदभाव, अपमान किंवा मानहानीकारक वर्तन आढळल्यास संबंधित व्यक्ती कायदेशीर उपाययोजना करु शकते.

जनजागृतीची गरजसामाजिक कार्यकर्त्यांनी नागरिक, लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी तसेच राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी भाषण करताना आणि सोशल मीडियावर पोस्ट करताना संवेदनशील भाषा वापरण्याचे आवाहन केले आहे. दिव्यांग व्यक्तींचा सन्मान राखणे ही केवळ कायदेशीर नव्हे तर सामाजिक जबाबदारी असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

दिव्यांग बांधवांबाबत अपमानास्पद शब्दप्रयोग टाळून त्यांना समानतेची व सन्मानाची वागणूक दिल्यास अधिक समावेशक आणि संवेदनशील समाज निर्माण होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

-----------------------------------

नोंद होत नसल्याचे निदर्शनास आले आहे.ग्रामीण तसेच शहरी भागांमध्ये बुद्ध विहार हे स्थानिक नागरिकांसाठी महत्त्वाचे ओळख केंद्र म्हणून वापरले जात असून जनगणना कर्मचाऱ्यांसाठी देखील ते मार्गदर्शक भूचिन्ह म्हणून उपयुक्त ठरु शकतात.त्यामुळे इतर धार्मिक स्थळांप्रमाणेच बुद्ध विहारांचाही Landmark Column मध्ये समावेश करण्यात यावा,अशी मागणी महासंघाच्या वतीने करण्यात आली आहे.

भारतीय संविधानातील समानतेच्या तत्त्वानुसार सर्व धार्मिक समुदायांना समान वागणूक मिळणे अपेक्षित असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच 14 जून रोजी संबंधित नकाशे अंतिम होणार असल्याने त्यापूर्वी आवश्यक दुरुस्ती करून संबंधित अधिकाऱ्यांना तातडीचे निर्देश देण्यात यावेत,अशीही मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान,बुद्ध विहारांची वस्तुनिष्ठ नोंद होणे ही केवळ धार्मिक बाब नसून स्थानिक प्रशासनिक ओळख आणि अचूक जनगणना व्यवस्थापनाच्या दृष्टीनेही आवश्यक बाब असल्याचे महासंघाचे तालुकाध्यक्ष राहुलकुमार टाकणखार व पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

-----------------------------------

त्यांच्याकडून ओटीपी घेण्यात आले. याच नावावर बनावट नोंदी करुन वाळू उपसल्याचे दाखवण्यात आले. इतकेच नव्हे, तर शासनाची ईटीपी प्रणालीही बोगस तयार करुन त्यात खोट्या नोंदी टाकण्यात आल्याचे उघड झाले आहे.शासकीय रेकॉर्डनुसार आतापर्यंत सुमारे 3 हजार ब्रास वाळू लाभार्थ्यांना वाटप केल्याचे दाखवण्यात आले आहे. मात्र ईटीएस अहवालातून प्रत्यक्षात 20 हजार ब्रासपेक्षा अधिक वाळूचा उपसा झाल्याचे स्पष्ट झाले आहे. म्हणजेच प्रत्यक्ष उपसा आणि कागदोपत्री नोंदी यामध्ये मोठी तफावत आहे.या प्रकरणात ज्या वाहनांद्वारे वाळूची वाहतूक करण्यात आली, ती वाहने जप्त करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच संबंधितांवर कोट्यवधी रुपयांचा दंड आकारण्याची शक्यताही वर्तवली जात आहे. आज संध्याकाळपर्यंत जिल्हाधिकारी स्तरावर मोठी प्रशासकीय कारवाई होऊ शकते, अशा हालचाली जिल्हा महसूल प्रशासनात सुरु आहेत. या कारवाईमुळे वाळू माफियांसह काही महसूल आणि पोलीस कर्मचाऱ्यांचेही धाबे दणाणले जाणार आहेत.

-----------------------------------

डीएपी व युरियाची कृत्रिम टंचाई करुन शेतकऱ्याची पिळवणूक होत असल्यामुळे आज अंबाजोगाई तालुक्यातील उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने तालुका कृषी अधिकारी विजय पवार यांना आंदोलन करून निवेदन देण्यात आले याप्रसंगी शिवसेना उपतालुकाप्रमुख गणेश पवार शहर प्रमुख अशोक खेडे विधानसभा प्रमुख केज मदन परदेशी ,शिवाजी खांडेकर राजेभाऊ सोमवंशी सुखदेव धोत्रे अशोक सुरवसे शंकर मिसे बाळासाहेब कदम ज्ञानबा पवार शिंदे पप्पू आदी शेतकरी शिवसेनीक उपस्थित होते.

-----------------------------------

हभप माने महाराज व हभप चौरे महाराज यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन करत शैक्षणिक संस्थेचे व कार्याचे महत्व सांगत या ठिकाणी गुणवत्ताधारक विद्यार्थी घडवण्याचे कार्य केले जाईल असा विश्वास व्यक्त केला. शिक्षण, ज्ञान प्रत्येक मानवासाठी खुप आवश्यक आहे असे त्यांनी यावेळी व्यक्त होतांनी म्हटले. प्रमुख पाहुणे म्हणून सिरसाळा सरपंच शेख नशीब, प्रा.एमबी धोंडगे, सुप्रसिद्ध कवी अनंत मुंडे, प्राचार्य अंजली कुलकर्णी दत्तोपंत देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमास सिरसाळा व परिसरातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मंडळी/ पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन धोंडगे यांनी केले तर आभार प्रदर्शन संस्थेचे सचिव सिद्धेश्वर कराड यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक कर्मचारी यानी मोठी मेहनत घेतली.

-----------------------------------

अनेकांना सावकारा कडून कर्जाचा आधार घ्यावा लागत असून आर्थिक अडचणींमुळे सामाजिक प्रश्न निर्माण होतात परळीतील युवकांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध झाला उद्योगधंद्यांना चालना मिळाली आणि कौशल्य विकासासाठी विशेष उपक्रम राबविण्यात आले तर शहराच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाला मोठी गती मिळू शकते. बेरोजगारी कमी झाल्यास युवक सकारात्मक दिशेने वाटचाल करतील आणि समाजातील अनेक समस्या आपोआप कमी होतीलपरळीला गुन्हेगारीमुक्त प्रगत आणि आत्मनिर्भर बनवायचे असेल तर युवकांच्या हाताला काम देणे अत्यावश्यक आहे. रोजगार निर्मिती, औद्योगिक गुंतवणूक, रोजगार मेळावे आणि कौशल्य विकास केंद्रांची उभारणी ही काळाची गरज आहे. शासन, लोकप्रतिनिधी आणि उद्योग क्षेत्राने यासाठी एकत्रित प्रयत्न करावेत अशी मागणी जमीर शेख यांनी केली.युवकांच्या हाताला रोजगार मिळाला तर कुटुंबे सक्षम होतील समाजात स्थैर्य निर्माण होईल आणि परळीच्या विकासाला नवी दिशा मिळेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

-----------------------------------

सहाय्यक व वरिष्ठ परिवहन सहाय्यक असे बदलणे, तसेच विभागाचा नवीन आकृतीबंध मंजूर होऊन चार वर्षांहून अधिक कालावधी लोटला असतानाही त्याचा प्रत्यक्ष लाभ कर्मचाऱ्यांना मिळालेला नाही. सेवा प्रवेश नियम तयार नसल्याचे कारण पुढे करून पदोन्नत्या रखडविण्यात आल्याने पात्र कर्मचारी पदोन्नती पासून वंचित राहत असल्याची नाराजी संघटनेने व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेने 9 जून रोजी राज्यव्यापी कामबंद आंदोलनाचा निर्णय घेतला असून, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबाजोगाई येथील सर्व कर्मचारी देखील या आंदोलनात सहभागी होणार आहेत.

संघटनेने शासनास इशारा देताना सांगितले की, आंदोलना नंतरही मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेऊन तोडगा काढला गेला नाही, तर पुढील काळात बेमुदत संप पुकारण्याचा निर्णय घेण्यात येईल. कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्या:कनिष्ठ लिपिक व वरिष्ठ लिपिक या पदांचे पदनाम अनुक्रमे परिवहन सहाय्यक व वरिष्ठ परिवहन सहाय्यक असे करावे. मंजूर झालेल्या आकृतीबंधा नुसार सेवा प्रवेश नियम तात्काळ लागू करावेत.पात्र कर्मचाऱ्यांना कार्यालयीन अधीक्षक व वरिष्ठ लिपिक पदांवर तात्काळ पदोन्नती द्यावी.,प्रशासकीय अधिकारी पदावरील पदोन्नत्या तात्काळ करण्यात याव्यात. कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांबाबत शासनाने त्वरित निर्णय घ्यावा, अशी मागणी संघटनेचे अप्रोज सिद्दिकी, सिद्धेश्वर घुले सूर्यकांत पाटील, सुरवसे अशोक बोलचटवार, अर्चना नरारे, पाटील यांनी कळविले आहे.

-----------------------------------

दुकानदारांकडून होणाऱ्या अडवणुकीच्या विरोधात शिवसेना तालुकाप्रमुख पृथ्वीराज पाटील, तालुका सचिव विकास काशीद, उप तालुकाप्रमुख महेंद्र चाटे आणि युवासेना तालुका प्रमुख दत्ता काकडे यांनी कृषी अधिकाऱ्यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन दिले व सविस्तर चर्चा केली.अनेक दुकानदार शेतकऱ्यांना बियाणे व खते खरेदी केल्यानंतर कच्ची पावती (एस्टिमेट) देऊन फसवणूक करतात. शेतकऱ्यांना केवळ आणि केवळ अधिकृत व ओरिजनल पावतीच देण्यात यावी, जेणेकरून भविष्यात बियाणे बोगसनिघाल्यास शेतकऱ्यांना क्लेम करता येईल.शेतकरी आधीच संकटात आहे. त्यात ऐन पेरणीच्या तोंडावर कृषी विभागाच्या नियोजना अभावी बियाण्यांसाठी त्याला वणवण फिरावे लागत असेल तर हे सहन केले जाणार नाही. तसेच, कोणत्याही दुकानदाराने खते-बियाणे चढ्या दराने विकल्यास किंवा कच्ची पावती दिल्यासशिवसेना स्टाईलने धडा शिकवला जाईल असा इशारा पृथ्वीराज पाटील तालुका प्रमुख, शिवसेना यांनी दिला आहे. यावेळी कृषी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या मागण्यांची दखल घेत, केज तालुक्यात बियाणे व खतांचा तुटवडा भासू दिला जाणार नाही आणि नियमबाह्य काम करणाऱ्या दुकानदारांवर भरारी पथकांद्वारे कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिले. या प्रसंगी शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि तालुक्यातील बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.

-----------------------------------

श्री मंगलनाथ मल्टीस्टेट चे व्यवस्थापकीय संचालक ॲड. रवींद्र कानडे हे कायदा, वित्तीय व्यवस्थापन आणि संघटनात्मक नेतृत्व या क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभवासाठी ओळखले जातात. विविध सामाजिक, शैक्षणिक आणि व्यावसायिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असून उद्योजकांना मार्गदर्शन करण्याचे कार्य ते सातत्याने करत आहेत.

संचालकपदी निवड झाल्यानंतर बोलताना ॲड. कानडे यांनी सांगितले की, "BCN Circle हे केवळ नेटवर्किंगचे व्यासपीठ नसून उद्योजकांच्या सर्वांगीण विकासाचे एक प्रभावी माध्यम आहे. विश्वास, सहकार्य आणि सकारात्मक व्यावसायिक संस्कृतीच्या माध्यमातून अधिकाधिक उद्योजकांना जोडून त्यांचा व्यवसाय वृद्धिंगत करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."Life Catalyst Pvt Ltd संस्थेचे संस्थापक अतुल ठाकूर, सहसंस्थापक अमरीश देशपांडे तसेच इतर पदाधिकाऱ्यांनी ॲड. कानडे यांच्या निवडीचे स्वागत करत त्यांना शुभेच्छा दिल्या. त्यांच्या नेतृत्वामुळे BCN Circle च्या कार्याला नवी दिशा मिळेल आणि मराठवाड्यातील उद्योजकांसाठी अधिक संधी निर्माण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.BCN Circle च्या माध्यमातून आगामी काळात उद्योजकांना व्यवसाय संदर्भ (Referrals), नवीन व्यावसायिक संधी, तज्ज्ञ मार्गदर्शन, प्रशिक्षण कार्यक्रम आणि उद्योगवृद्धीसाठी आवश्यक नेटवर्क उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.विश्वास, सहकार्य आणि व्यवसाय वृद्धीच्या ध्येयाने कार्य करणाऱ्या BCN Circle चा शुभारंभ ज्येष्ठ उद्योजक, विविध राष्ट्रीय पुरस्कार विजेते डॉक्टर भावेश भाटिया यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी छत्रपती संभाजी नगर व मराठवाड्यामधील विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी व उद्योजक यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

-----------------------------------

आणि करून दिली होती. रस्ते व इतर आरोग्याची सुविधा उपलब्ध विकासाची कामे मार्गी लावली होती. मात्र त्यांच्या पश्चात त्यांच्या गावाला जोडणाऱ्या रस्त्याच्या दुरवस्थेकडे प्रशासन आणि संबंधित विभागाने दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. केज- नांदूरघाट या रस्त्यावर राजेगावकडे जाणाऱ्या केवळ दोन ते अडीच कि. मी. अंतराच्या रस्त्याचे काम गेल्या काही वर्षांपासून करण्यात आलेले नाही. त्यामुळे रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे.रस्त्यावरील डांबरी थर निघून गेला असून खालचा मुरुम उघडा पडला आहे. त्यामुळे रस्ता हा मुरमाचे आहे की काय असे रस्त्याकडे पाहून दिसून येते. जागोजागी खड्डे पडल्याने रस्त्याची अक्षरश चाळणी झाली असून वाहन चालकांना कसरत लागत आहे. प्रशासनाने दखल घेण्याची मागणी होत आहे.

-----------------------------------

तरी कृषी विभागाने शेतकरी ग्राहकांना तात्काळ शासनाचे बियाणे उपलब्ध करून द्यावेत. शेतकरी ग्राहकांना मानसिक व आर्थिक त्रासापासून मुक्त करावे अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी या पत्राद्वारे केली आहे. यासाठी संदेश, सातबारा, आठ अ, आधार कार्ड,फॉर्मर आयडी अशी कागदपत्रे घेऊन येण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तरी कृषी विभागाने तात्काळ बियाणे उपलब्ध करून शेतकरी ग्राहकांना मानसिक व आर्थिक त्रासातून मुक्तता करावी अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी केली आहे .

-----------------------------------

हॅलो बीड

परळी संघर्षनेता

बुधवार दि. 10 जुन 2026



# नव्वदच्या दशकातील परळीतील स्टार क्रिकेट खेळाडुंचे गेट टुगेदर संपन्न

## रंगतदार सामना व स्नेह भोजनाचा घेतला आस्वाद



परळी प्रतिनिधी. 90 च्या दशकातील परळी शहरातील स्टार क्रिकेट खेळाडूंचे गेट-टुगेदर नुकतेच संपन्न झाले. शहरातील या खेळाडूंनी परत एकदा नव्या उत्साहाने क्रिकेटच्या मैदानावर उतरुन एक रंगतदार सामना खेळला व जुन्या आठवणींना पुन्हा एकदा उजाळा दिला. क्रिकेट सामन्यानंतर क्रिकेट खेळाडू डिंपी भाटिया यांनी सर्व मित्रांसाठी आयोजित केलेल्या स्नेहभोजनाचाही सर्वांनी आस्वाद घेतला.

एकेकाळी क्रिकेटच्या मैदानावर तारुण्यात असताना अष्टपैलू कामगिरी करणारे परळी शहरातील 30 ते 40 खेळाडू सुमारे 20 ते 25 वर्षांनी पुन्हा एकदा एकत्र आले. डिंपी भाटिया ,नगरसेवक व उत्कृष्ट क्रिकेट खेळाडू म्हणून ज्यांची ख्याती होती असे निळकंठ चाटे तसेच क्रीडाशिक्षक अजय जोशी व प्रसिद्ध पत्रकार व लेखक तसेच क्रिकेट खेळाडू म्हणून प्रसिद्ध असलेले रानबा गायकवाड यांनी एकत्र येऊन शहरातील सर्व जुन्या क्रिकेट खेळाडूंना एकत्रित आणले. त्या सर्व क्रिकेट खेळाडूंचा एक व्हाट्सअप ग्रुप तयार करून सर्व मित्रांना गेट-टुगेदर साठी निमंत्रण देण्यात आले. 7 जून पान 3 वर

# कृषी सेवा केंद्र चालकाकडून नातेवाईकांना रात्रीच बियाणे वाटप केल्याचा व्हिडीओ समोर



वडवणी प्रतिनिधी :शेतकऱ्यांना शासनाकडून अनुदानित दरात वितरित करण्यात येत असलेल्या सोयाबीन बियाणे वाटप प्रक्रियेत मोठा घोळ झाल्याचा आरोप संबंधित शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. दिवसभर कृषी सेवा केंद्रासमोर रांगेत उभे राहूनही अनेक शेतकऱ्यांना “बियाणे संपले” असे सांगून परत पाठविण्यात आले. मात्र रात्री उशिरापर्यंत काही निवडक व्यक्तींना आणि नातेवाईकांना बियाण्यांचे वाटप सुरु असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अनेक शेतकरी सकाळपासून कृषी सेवा केंद्रावर अनुदानित सोयाबीन बियाण्यासाठी प्रतीक्षा करत होते. दिवसभर थांबूनही बियाणे उपलब्ध नसल्याचे कारण देत त्यांना रिकाम्या हाताने परत जावे लागले. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

विशेष म्हणजे, दिवसभर बियाणे संपल्याचे सांगितले जात असताना रात्री काही विशिष्ट व्यक्तींना बियाणे वाटप करण्यात आल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. यामध्ये संबंधित कृषी सेवा केंद्र चालकाच्या नातेवाईकांनाही प्राधान्य देण्यात आल्याची चर्चा असून यामुळे पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

“सामान्य शेतकऱ्यांना दिवसभर हेलपाटे मारायला लावले जाते, तर काही मोजक्याच लोकांना रात्रीच्या अंधारात बियाणे दिले जाते. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी,” अशी मागणी संतप्त शेतकऱ्यांनी केली आहे.

या प्रकरणामुळे कृषी विभागाच्या नियोजनावरही प्रश्न उपस्थित होत असून अनुदानित बियाणे वाटपाची संपूर्ण यादी, पान 3 वर

# अवैध वाळू उपसा प्रकरणी शासनाची ईटीपी प्रणालीही बोगस, अनेकांवर कारवाईची टांगती तलवार...



गेवराई दि. 9 ( प्रविण कुलथे )- राक्षसभुवन येथील अवैध वाळू उपसा प्रकरणात शासनाची थेट फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. केवळ जमिनीतून मोठ्या प्रमाणावर वाळूचा बेकायदेशीर उपसा झाला एवढेच नाही, तर शासनाची ईटीपी प्रणालीही बोगस तयार करून नोंदींमध्ये फेरफार केल्याची धक्कादायक माहिती उघड झाली आहे.

या संपूर्ण प्रकरणावर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बारकाईने लक्ष केंद्रित केले आहे. प्रकरणाशी निगडीत असणारे वाळू माफिया, काही पोलीस कर्मचारी आणि महसूल विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार आहे. जिल्हा प्रशासनाने याप्रकरणी आक्रमक पवित्रा घेतला असून, गेल्या काही दिवसांपासून चौकशीला वेग आला आहे.

आमदार विजयसिंह पंडित यांनी घरकूल लाभार्थ्यांच्या नावे बोगस वाळू उपसा झाल्याची तक्रार दिल्यानंतर जिल्हा प्रशासन ॲक्शन मोडवर आले. त्यानुसार शासकीय नोंदवहीतील 843 लाभार्थ्यांची तपासणी सुरु करण्यात आली. पान 3 वर

# दिव्यांग व्यक्तींविषयी आक्षेपार्ह शब्दांचा वापर केल्यास कारवाई; राजकीय पक्षांनाही नियम लागू




वडवणी प्रतिनिधी :समाजात दिव्यांग व्यक्तींविषयी आदर आणि संवेदनशीलता वाढविण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने विविध कायदे व मार्गदर्शक तत्त्वे लागू केली आहेत. त्यानुसार दिव्यांग व्यक्तींना संबोधित करताना “वेढा”, “मूकबधिर”,”आंधळा”,”लंगडा” “भैरा” “पांगळा”अशा अवमानकारक अथवा अपमानास्पद शब्दांचा वापर केल्यास संबंधित व्यक्ती, संस्था, राजकीय पक्ष, किंवा संघटनांविरुद्ध तक्रार दाखल होऊन कायदेशीर कारवाई होऊ शकते. त्या संदर्भात तालुक्यातील दिव्यांगांनी वडवणी पोलीस स्टेशनला तसे निवेदनही दिले आहे.

तज्ज्ञांच्या मते, दिव्यांगत्व ही व्यक्तीची ओळख नसून त्यांची एक शारीरिक अथवा मानसिक स्थिती आहे. त्यामुळे व्यक्तीला तिच्या नावाने किंवा “दिव्यांग व्यक्ती”, “दृष्टीदोष असलेली व्यक्ती”, “श्रवणदोष असलेली व्यक्ती”, “चालण्यात अडचण असलेली व्यक्ती” अशा सन्मानपूर्वक शब्दांत संबोधणे अपेक्षित आहे.

राजकीय पक्षांनाही नियमांचे पालन बंधनकारकनिवडणूक प्रचारसभा, जाहीर पान 3 वर

# जनगणना गटमांडणी दर्शक नकाशामध्ये बुद्ध विहारांचा समावेश करावा

## प्रशासनाकडे कास्ट्राईबचा पाठपुरावा.

माजलगाव : ( हरिश जाधव )सध्या सुरु असलेल्या भारतीय जनगणना 2026-27 च्या प्रक्रियेमध्ये गटमांडणी दर्शक नकाशा तयार करताना विविध धार्मिक स्थळांचा लँडमार्क म्हणून समावेश करण्यात येत असताना बुद्ध विहारांचाही समावेश करण्यात यावा,यासाठी महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने प्रशासनाकडे पाठपुरावा सुरु करण्यात आला आहे.

यासंदर्भात मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी यांना मा.तहसीलदार माजलगाव यांच्या मार्फत केलेल्या ई-मेलद्वारे निवेदन सादर करण्यात आले असून संबंधित जनगणना यंत्रणा,राज्य जनगणना संचालनालय तसेच इतर प्रशासकीय अधिकाऱ्यांनाही ई-मेलद्वारे प्रतिलिपी पाठविण्यात आल्या आहेत.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, जनगणना गटमांडणी दर्शक नकाशामध्ये मंदिर,मशीद,चर्च,गुरुद्वारा आदी धार्मिक स्थळांचा लँडमार्क म्हणून समावेश करण्यात येत आहे.मात्र अनेक गावांमध्ये स्थानिक ओळख,मार्गदर्शक केंद्र व सामाजिक-सांस्कृतिक स्थळ म्हणून अस्तित्वात असलेल्या बुद्ध विहारांचा गटमांडणी नकाशामध्ये समावेश नसल्याने त्याची स्पष्ट पान 3 वर

# अवैध वाळू उपसा प्रकरणी शासनाची ईटीपी प्रणालीही बोगस

## अनेकांवर कारवाईची टांगती तलवार...

गेवराई दि. 9 ( प्रविण कुलथे )- राक्षसभुवन येथील अवैध वाळू उपसा प्रकरणात शासनाची थेट फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. केवळ जमिनीतून मोठ्या प्रमाणावर वाळूचा बेकायदेशीर उपसा झाला एवढेच नाही, तर शासनाची ईटीपी प्रणालीही बोगस तयार करून नोंदींमध्ये फेरफार केल्याची धक्कादायक माहिती उघड झाली आहे.

या संपूर्ण प्रकरणावर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बारकाईने लक्ष केंद्रित केले आहे. प्रकरणाशी निगडीत असणारे वाळू माफिया, काही पोलीस कर्मचारी आणि महसूल विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार आहे. जिल्हा प्रशासनाने याप्रकरणी आक्रमक पवित्रा घेतला असून, गेल्या काही दिवसांपासून चौकशीला वेग आला आहे.

आमदार विजयसिंह पंडित यांनी घरकूल लाभार्थ्यांच्या नावे बोगस वाळू उपसा झाल्याची तक्रार दिल्यानंतर जिल्हा प्रशासन ॲक्शन मोडवर आले. त्यानुसार शासकीय नोंदवहीतील 843 लाभार्थ्यांची तपासणी सुरु करण्यात आली. काल दिवसभरात 50 हून अधिक घरकूल लाभार्थ्यांची चौकशी पूर्ण झाली असून, या तपासणीचा अहवाल आज जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द होण्याची शक्यता आहे.

चौकशीत समोर आले की, काही लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांचे पैसे मिळवून देतो, असे आमिष दाखवून पान 3 वर

# महाडीबीटी योजने अंतर्गतच्या बियाणे वाटपात बट्ट्याघोळ !

## कृषी मंत्री भरणे यांनी शेतकऱ्यांच्या तोंडला पाने पुसली !



अंबाजोगाई प्रतिनिधी/ रोहन गलांडे

अंबाजोगाई तालुक्यातील शेतकऱ्यांनी महाडीबीटी योजनेअंतर्गत ऑनलाइन नाव नोंदणी साडेसहा हजार शेतकऱ्यांनी सोयाबीन बियाण्यासाठी केली होती, त्यात केवळ 1827 शेतकऱ्यांना ची नावे सोयाबीन बियाण्यात आली ,भाजप सरकारचे कृषिमंत्री दत्ता भरणे यांनी केवळ शेतकऱ्यांच्या तोंडाला पाणे पुसली, शिवसैनिकांना मा विरोधीपक्ष नेते यानी जसा मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी आवाज उठवता त्याचीच प्रेरणा घेऊन अंबाजोगाई शिवसैनिक शेतकऱ्यांसाठी लडत आहे शेतकऱ्यांना द्यायचे नव्हते तर सहा हजार शेतकऱ्यांना का नाव नोंदणी करून घेतली ?करण्यास लावली त्याचा खर्च झाला ,याची जिमेदारी कोण घेणार ,व अंबाजोगाई तालुक्यातील शेतकऱ्यांची अनुदानित खत पान 3 वर

# गुणवंत विद्यार्थी घडवण्याचे कार्य या संस्थेत व्हावे -एकनाथ महाराज माने

## • सिरसाळ्यात स्वामी विवेकानंद पब्लिक स्कूलचा शुभारंभ संपन्न

प्रतिनिधी | सिरसाळा : सीबीएसई पॅटर्नची इंग्रजी माध्यमाची असणारी स्वामी विवेकानंद पब्लिक स्कूल हि शैक्षणिक संस्था सिरसाळ्यात उभारली. दिनांक 7 जून रोजी एकनाथ महाराज माने (श्री.संत नारायण बाबा संस्थान वांगी ) यांच्या हस्ते या शैक्षणिक संस्थेचा शुभारंभ करण्यात आला आहे.

चंद्रकांत कराड,सिद्धेश्वर कराड या कराड बंधूंनी या भव्य व दर्जेदार शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक सीबीएसई पॅटर्न असणाऱ्या शैक्षणिक संस्थेची स्थापना केली. सिरसाळ्या सारख्या ग्रामीण भागात दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे व ग्रामीण भागातील विद्यार्थी घडावा या उद्देशाने प्रेरित होऊन कराड बंधूंनी स्वामी विवेकानंद पब्लिक स्कूल सिरसाळा - पोहनेर रोडवर ग्लोबल विकास ट्रस्ट लगत च्या भागात स्थापन केली आहे.

काल शुभारंभ कार्यक्रमास एकनाथ महाराज माने, महंत अण्णासाहेब महाराज चौरे, यांच्या शुभाशिर्वादाने सिरसाळा व परिसरातील मान्यवरांच्या उपस्थितीत फित कापूस शुभारंभ करण्यात आला आहे. दरम्यान पान 3 वर

# गुन्हेगारीमुक्त परळी हवी असेल तर रोजगार निर्मिती हाच उपाय : जमीर शेख



परळी, प्रतिनिधी : परळी हे महाराष्ट्राच्या विकासात महत्त्वाचे योगदान देणारे शहर असूनही येथील सुशिक्षित युवकांना पुरेशा प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नसल्याची खंत सामाजिक कार्यकर्ते जमीर शेख यांनी व्यक्त केली आहे. परळीत थर्मल पॉवर स्टेशनसारखा महत्त्वाचा वीज निर्मिती प्रकल्प, रेल्वे जंक्शन होण्याच्या मार्गावरील शहराचे वाढते महत्त्व असूनही स्थानिक युवकांना रोजगारासाठी पुणे मुंबईसह इतर शहरांकडे स्थलांतर करावे लागतआहे.

परळीतील सुमारे 40 टक्के सुशिक्षित युवक रोजगारासाठी बाहेरगावी काम करीत आहे तरी मोठा वर्ग अजूनही रोजंदारीवर अवलंबून आहे. रोजंदारीचे काम अनिश्चित असल्याने अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवत आहे. पान 3 वर

# आरटीओ कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसाठी

## अंबाजोगाई कार्यालयाचे काम बंद आंदोलन !




केज प्रतिनिधी/ रोहन गलांडे राज्यातील सर्व आरटीओ कार्यालयांचे कामकाज 9 जून रोजी बंद रहाणार आहेत. महाराष्ट्र राज्य मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेच्या वतीने कर्मचाऱ्यांच्या दीर्घकालीन प्रलंबित मागण्यांसंदर्भात राज्य भरातील सर्व प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये (आरटीओ) दिनांक 9 जून 2026 रोजी एक दिवसाचे कामबंद आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी यापूर्वी अनेक वेळा निवेदने, आंदोलने, मोर्चे व विविध प्रकारची आंदोलनात्मक पावले उचलण्यात आली. मात्र प्रशासनाकडून मागण्यां कडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.विशेषत कनिष्ठ लिपिक व वरिष्ठ लिपिक या पदांचे पदनाम अनुक्रमे परिवहन पान 3 वर

# शिवसेना पक्षाने तालुका कृषीअधिकारी यांना धारेवर धरत केल्या विविध मागण्या!



केज प्रतिनिधी/ रोहन गलांडे केज तालुक्यात खरीप हंगामाच्या पूर्वतयारीची लगबग सुरु झाली आहे. मात्र, ऑनलाइन नोंदणी करूनही सोयाबीन बियाणे मिळण्यात येणाऱ्या अडचणी आणि खतांची होणारी जादा दराने विक्री या पार्श्वभूमी वर शिवसेना पक्षाच्या वतीने तालुका कृषी अधिकाऱ्यांना धारेवर धरण्यात आले. ऑनलाइन नोंदणी केलेल्या सर्वशेतकऱ्यांना तात्काळ सोयाबीन बियाणे उपलब्ध करून द्यावे, तसेच ज्यांची नावे यादीत आली नाहीत त्यांच्यासाठी पर्यायी उपाययोजना करावी अशी आक्रमक मागणी शिवसेना तालुकाप्रमुख पृथ्वीराज पाटील यांनी केली आहे. तालुक्यातील खत आणि बियाणे टंचाई तसेच पान 3 वर

# उद्योजकांचे व्यासपीठ बी सी एन सर्कल च्या संचालक पदी अॅड रवींद्र कानडे यांची निवड.




माजलगाव ( अनंत घडसिंगे ) : विश्वास, पारदर्शकता आणि व्यावसायिक प्रगती या मूल्यांवर आधारित कार्य करणाऱ्या BCN Circle (Business Catalyst Network) या उद्योजकांच्या प्रतिष्ठित नेटवर्क संस्थेच्या संचालकपदी शहरातील प्रसिद्ध उद्योजक अॅड. रवींद्र कानडे यांची निवड करण्यात आली आहे.

लाइफ कॅटलिस्ट प्रायव्हेट लिमिटेड

यांचे मार्फत BCN Circle ही संस्था विविध क्षेत्रातील उद्योजक, व्यावसायिक आणि तज्ज्ञ व्यक्तींना एकत्र आणून परस्पर सहकार्य, व्यावसायिक संधींची देवाणघेवाण, विश्वासार्ह नेटवर्किंग आणि दीर्घकालीन व्यावसायिक संबंध निर्माण करण्यासाठी कार्यरत आहे. संस्थेच्या वाढत्या विस्ताराच्या पार्श्वभूमीवर अॅड. रवींद्र कानडे यांच्या अनुभवाचा लाभ संस्थेला मिळणार असल्याचा विश्वास सदस्यांनी व्यक्त केला आहे.

पान 3 वर


# राजेगावच्या रस्त्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष !

## • रस्त्यावर जागोजागी खड्डे; वाहनचालकांची कसरत, रस्त्याची दुरुस्ती करावी !



केज प्रतिनिधी/ रोहन गलांडे शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष स्व. विनायक मेटे यांच्या पश्चात त्यांच्या राजेगाव या गावाच्या रस्त्याच्या दुरवस्थेकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे. या गावाला जोडणाऱ्या केवळ दोन ते अडीच कि. मी. अंतराच्या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहेत. रस्त्यावरील डांबरी थर निघून गेला असून खालचा मुरुम उघडा पडला. त्यामुळे वाहन चालकांना कसरत करावी लागत असून ग्रामस्थांची अडचण झाली आहे. शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष स्व. विनायक मेटे यांची राज्याच्या राजकारणात वेगळी ओळख होती. तर प्रशासनात त्यांचा दबदबा होता. त्यांनी आपल्या गावात विद्युत महावितरणचे 33 केव्ही उपकेंद्र आणि प्राथमिक आरोग्य केंद्र आणले होते. वीज पान 3 वर

# जिल्ह्यातील शेतकरी ग्राहकांना बियाणे तात्काळ उपलब्ध करून द्या :- अनिल बोर्डे



गेवराई( प्रतिनिधी) खरीप हंगाम सन 2026- 27 सोयाबीन वितरण या घटकासाठी निवड झाली आहे. सदर घटकाचा लाभ घेण्यासाठी आपण कृषी बियाणा चा लाभ घ्यावा विभाग यांच्याशी संपर्क साधावा असे संदेश शेतकरी ग्राहकांना प्राप्त झाले आहेत व सदरील आज पासून पाच दिवसाच्या आत बियाणे घटकाचा लाभ घ्यावा असे संदेश शेतकरी ग्राहकांना प्राप्त झाले आहेत परंतु प्रत्यक्षात कृषी विभागाकडे किंवा संबंधित एजन्सीकडे बियाणे उपलब्ध नसल्यामुळे शेतकरी ग्राहकांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. नियुक्त कृषी विक्रेत्याकडे बियाणे उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे त्यामुळे शेतकरी ग्राहकांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे हे योग्य नाही पान 3 वर